# भारतीय स्वातंत्र्यासाठी लढ्यातील काही अज्ञात स्त्रियांचे योगदान

**हर्षदा कांबळे,** टी.वाय. बी.ए.
जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी

स्वातंत्र्यासाठी आपल्या देशातल्या लोकांनी अनेक लढे दिले. प्रसंगी आपले रक्त सांडले, बलिदान दिले, हुतात्म ही पत्कारले आणि त्यातून देशबांधवांचे स्वातंत्र्याचे स्वप्न साकार झाले. यात भारतीय स्त्रियांदेखील मागे नव्हत्या. भारतीय स्त्रियांनी केलेले त्याग, धैर्य व चाणक्षपण हा अवर्णनीय आहे. घराच्या उंबरठ्याबाहेर न येणाऱ्या स्त्रिया निर्भय बनून त्यांनी जुलमी परकीय सरकारशी सामना करून आपला प्राण धारातीर्थी सोडला, तर काहींनी लाठ्या खाल्ल्या, तुरूंगवासही भोगला, अशाच असंख्य अज्ञात स्त्रियांचे 19 व्या व 20 व्या शतकातील स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

19 व्या शतकात राणी लक्ष्मीबाई व तिच्या सहकारिणी यांच्या 1857 मधील सहभागाची गाथा सर्वांनाच माहित आहे. कर्नाटकामधील कित्तूर या छोट्या संस्थानाची राणी चेनम्मा हिने ईस्ट इंडिया कंपनीशी प्रशिक्षित सेनेशी निकराने प्रतिकार केला. या प्रतिकारात तिला अपयश आल्याने धारवाडच्या तुरूंगात 1824 ते 1830 पर्यंत ठेवण्यात आले. तुरूगांतच मरण पावलेली ही आपली पहिली स्वातंत्र्यसैनिका. तर 1857 च्या उठावात ईस्ट इंडिया कंपनीच्या फलटणीला कडवा विरोध करत असताना आलिया बेगम व अझीझन यांनी आपला देह धारातीर्थी ठेवला. दुसऱ्या नानासाहेब पेशव्यांची कन्या मैनावती हिने जिवंत जळून जात असतानाही नानासाहेबांच्या ठावठिकाणा सांगितला नाही. इतकी मोठी कर्तबगारी या स्त्रियांनी दाखविली.

विसाव्या दशकातील पहिल्या सर्वश्रेष्ठ स्वातंत्र्यसैनिक म्हणजे मादाम कामा हे आपणांस ठाऊकच आहे. पण परदेशात राहून भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारी आणखी एक हिंदू–कन्या म्हणजे कुमारी वेलुयाम्मा. आफ्रिकेत तिने गांधीजींच्या सांगण्यापत्रमाणे स्त्रियांचे एक सत्याग्रही पथक तयार केले. त्यामुळे तिला कैद करून मारसोड केली. गांधीजींचा निरोप येऊनही तिने माघार घेतली नाही. अवघ्या 16 व्या वर्षी वेलुयाम्माचा तुरूंगात मृत्यू झाला, त्यामुळे विसाव्या शतकातील आणि आफ्रिकेतील ती पहिली हुतात्मा ठरली. अशीच एक उत्तर–भारतीय लाडोराणी झुत्स नामक महिलेने परदेशी कापड्यांच्या होळ्या केल्या, दारू दुकानेही पेटवली. निदर्शने करत असतानाच पंजाब पोलिसांनी तिला मरेपर्यंत मारले. 1920 ते 1942 पर्यंत आंदोलनात सहभागी झालेने तिला सतत कारावास घडला. तर गुजरातमधील हंसा मेहता यांनी देशसेविका संघ तयार करून परदेशी कापड्यांच्या मालावर बहिष्कार घालून दारू दुकानावर निरोधने केली. सायमन कमिशनला त्यांनी सक्रीय विरोध करत असताना त्यांना तुरूंगवासही झाला.

किलरेस्कर थिएटरातील 1920 मधील गांधीजींचे भाषण ऐकून प्रभावित झालेल्या अत्यभामा कुवळेकर या बालविधवा झालेल्या 22 वर्षाच्या तरूणीने आपल्या अंगावरचे दागिने काढून गांधीना देशकार्यासाठी दिले व आजन्म सोने व वापरण्याची त्यांच्यासमोर शपथ घेऊन तिने तीत मृत्यूपर्यंत पाळली. व्यंकटराव हरोलीवर नावाच्या कार्यकर्त्याला मधरोग झाला म्हणून त्याला तुरूंगातून सोडून कुणीही नाही. याचे सत्यभामेला फार वाईट वाटले. म्हणून ती दिवसभर हरोलीकरांच्या घरी जावून सर्व कामे करीत असे. पण एक बालविधवा एकट्या पुरूषांच्या घरी जाऊन 4–5 तास घालवते, याबद्द लोकपवादाला तोंड फुटणे साहजिकच होते. तो वाद टाळावा म्हणून तिने व्यंकटरावांशी लग्न केले. नंतर व्यंकटरावांबरोबर जवळजवळ 20 वर्षे तिने विधायक कार्यकर्ता म्हणून काम केले.

गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाकडे आकर्षित झालेल्या मध्यमवर्गीय व तळागळातील स्त्रीयांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे सायमन कमिशन वर बहिष्कार घालण्याच्या चळवळीत ही संख्या आणखीनच वाढत गेली. बंगाली कन्या वीणा दासने सायमन कमिशनला विरोध करण्यसाठी मुलींचा गट तयार केला. 1932 साली स्वतःची पदवी घेण्यासाठी ती व्यासपीठावर चढली असताना गव्हर्नर जॅक्सन हे तीला पदवी देणार इतक्यातच तिने पदराखाली लपवलेले पिस्तूल काढून त्यांना गोळ्या झाडल्या तर नागालॅंडची राणी गिदालू ही स्त्रीयांच्या झालेल्या शिक्षेत सर्वात अधिक शिक्षा भोगलेली स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक होती. 1932 साली 17 व्या वर्षी तिला शिक्षा झाली व 15 ऑगस्ट 1947 ला सुटका झाली.

आसाममधील कनकलता बारूआ 16 वर्षाची असताना पोलिस स्टेशनसमोर झेंडावंदन करून तिने प्रक्षोभक भाषण केल्यामुळेच पोलिसांनी गोळीबार करून कनकलतेचा अंत केला. 20 व्या शतकात भारत भूमीवर हुतात्मा घेण्याचा भारतीय युवतीत पहिला मान कनकलतेला मिळाला.

1911 मध्ये बंगाल येथील चितगावात जन्मलेल्या प्रीतीलता वड्डेदार या 21 वर्षाच्या तरूणीने इंग्रजाविरूद्ध लढताना आपल्या प्राणाची आहुती दिली. फिलॉसॉफी विषयामध्ये पदवी प्राप्त करून तिने गावातील एका शाळेत मुख्याध्यापिका म्हणून काम केले. देशसेवा करण्याची इच्छा असल्याने क्रांतीकारकाचे प्रेरणास्थान बनलेले सुर्यसेन यांची त्यांनी भेट घेऊन आंदोलनात सक्रीय भाग घेतला. त्या क्रांतीकारी गटाच्या सदस्य बनल्यानंतर टेलिग्राम ऑफिसवरील हल्ला करणे, रिजर्व पोलिसलाईन ताब्यात घेणे असे बरेच कारनामे सुद्धा त्यांनी केले. जलालाबाद येथील क्रांतीकारी हमल्या दरम्यान त्यांनी स्फोटक नेण्याची जबाबदारी ही स्विकारली होती. 23 सप्टेंबर 1932 रोजी युरोपियन क्लबवर हल्ला करण्यसाठी निवडलेल्या क्रांतीकारकांना जीवंत पकडले जाऊ नये म्हणून पोटॅशिअम सायनाईड ची गोळी देण्यात आली. प्रितीलताने या हल्ल्यासाठी एका पंजाबी माणसासारखी वेशभुषा केली होती. 23 सप्टेंबर दिवशी सकाळी 11 वाजता झालेल्या हल्ल्याच्यावेळी 40 इंग्रज अधिकारी आणि काही इंग्रज पोलिस उपस्थित होते. आग लागल्याने पोलिसांनी केलेल्या गोळीबारात प्रीतीलताला गोळी लागली. इंग्रजांनी तिला घेरावा घालताच प्रितीलताने क्षणाचाही विचार न करता सायनाईडची गोळी घेतली व इंग्रजांना फक्त तिचा मृतदेह मिळाला. अशाप्रकारे अद्वितीय साहस दाखवत तिने देशासाठी बलिदान दिले.

प्रीतीलता बरोबरच कल्पना दत्ता हिलादेखिल युरोपियन क्लब हल्ला करण्यासाठी नेमले. पण हल्ला करण्याच्या एक आठवडा आधीच जागेची हेटाळणी करताना तीला अटक झाली. जामिनीवर सुटका झाल्याने तिने लपून राहण्यास सुरूवात केली. 17 फेब्रुवारी 1933 ला पोलिसांनी तिच्या लपण्याच्या जागेला घेरा घालून सूर्यसेन याला पकडले मात्र कल्पना तेथून



Scanned with CamScanner

पळाली. पुढे कल्पनाला 11 मे 1933 रोजी अटक झाली. चितगाव धाडीच्या दुस–या सुनावणीत तिला शिक्षा होऊन 1939 ला सुटका झाली. 1943 च्या बंगालमधील दुष्काळात व बंगालच्या फाळणीच्या वेळेस तिने स्वंयसेवक म्हणून काम केले.

कायदेभंगाच्या चळवळीत सामाजिक व राष्ट्रीय स्वांतत्र्याच्या लढ्यात भाग घेतला तर काही महिला मीठाच्या सत्याग्रहात अग्रस्थानी होत्या, मातृभूमीच्या मुक्तीसाठी पुरूष बांधवांबरोबर सर्व संकटे व त्याग करण्यास सिध्द झाले पाहिजे, असा संदेश सरोजिनी नायडू यांनी धारासना येथील मीठागारावरील हल्ला करण्यापूर्वी केलेल्या भाषणात दिला. प्राग येथील शांतता व स्वातंत्र्यासाठी स्त्रियांचा संघ या आंतरराष्ट्रीय परिषदेला भारताच्या प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या कमलादेवी चटोपाध्याय यांना बेकायदेशीर मीठ तयार करणे व विकणे, यासाठी अटक झाली. कमलादेवी व अवंतिकाबाई गोखले या कायदेभंग करणा–या स्त्रिया. तसेच वडाळ्याा जमावातून येऊन काटेरी ता–यांच्या कुंपणावर चढून एका स्त्रीने मीठावरील मीठ आपल्या साडीत घेऊन ती पशार झाली. आणि मीठाच्या पुड्या विकल्या व लीलाव करून चळवळीसाठी निधी जमवला. 1930 च्या कायदेभंगाच्या चळवळीत जवळजवळ 12000 स्त्रियांना तुरूंगावासाची शिक्षा झाली होती.

तर काही ग्रामीण भागातील महिलां जंगल सत्याग्रहातही सहभागी झाल्या होत्या. सातारा जिल्ह्यातील सागवानासाठी प्रसिद्ध असणा–या बळाशी गावात सरकारचे राखीव जंगल होते. तेथील एका महादेवाच्या देवळाच्या आवारात एक झाड तोडून त्याच्या सागवानी ध्वजारतंभ सत्याग्रही स्वयंसेवकांनी उभारला, आणि त्यावर तिरंगा फडकवला, हा झेंडा पाडण्यासाठी आलेल्या पोलिसांना अडवून गावक–यांनी 18 जुलै ते 5 सप्टेंबर पर्यंत झेंड्याचे रक्षण केले. 5 सप्टेंबरला आलेल्या पोलिसांच्या तुकडीने गावक–यावंर व स्वयंसेवकांवर तूफानी हल्ला केले आणि तिरंगा ताब्यात घेतला. यावेळी भीमाबाई साठे यांनी आपल्या जीवाची बाजी लावली. नाशिक जिल्हयातील राधिकाबाई आपटे हिंसात्मक वातावरण टिकवण्यात मोठे यश मिळवले. 3 ते 4 हजारांच्या पोलिसांवर हल्ला करण्यासाठी झालेल्या लाठीमारी जमावाल शांत करून घरी पाठवले. भूमिगत चळवळीतील आंदोलनात सक्रीय योगदान होते. भूमिगतांसाठी निदर्शनात्मक हालचालीत व गोपनीय प्रचारात त्यांचे योगदान होते. सांकेतिकी भाषेत कांतिकारकांना निरोप देणे, फरारींना आपल्या घरात आश्रय देणे आजारी स्वयंसेवकांची सेवा करणे, रिव्हॉल्व्हर व बंदुका इ.कामे तरूणींनी प्राणावर उदार करत राजमती पाटील, लीता पाटील, इंदू पाटणकर या स्त्रियांचे गस्त घालणे, स्फोटक द्रव्ये योग्य ठिकाणी नेऊन पोहचिवणे, रेल्वे रूळ उखडणे, स्टेशन जाळणे, 1942 मध्ये सालच्या या लढ्यात पकडलेल्या मुलींला ठेवायला तुरूंग अपुरे पडले, येरवडा जेलमध्ये तर स्त्रियांनी सोय करायला तंबू ठोकून शांती घोष व सुनीती चौधरी या दोन शाळकरी मुलींनी जिल्हा न्यायाधीशाला ठार केले सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, दादाभाई नौरोजींच्या नाती, पेरीन, खुशीद, गोशीबेन, मिठीबेन पेटिट, रूक्मिणी अमंडेल, मुथुलक्ष्मी रेड्डी प्रेमा कंटक, अनुसुया काळे, मनमोहनी झुन्सी अशा अनेक सुसंस्कृत व उच्चमध्यमवर्गीय सुशिक्षित महिला स्वातंत्र्याच्या लढ्यात नेत्या म्हणून कृपलानी, अरूणा असफअली, मृदूला साराभाई, उषाबेन मेहता, सावित्री मदन, पदमजा नायडू, किसन घुमटकर, मृणालिणी देसाई, अनुसया लिमये यांनी स्वतःला झोकून दिले.

गांधीजींच्या नेतृत्वाखाली चळवळीत स्त्रियांनी प्रत्येक टप्पांवर अनंत अडचणींना सामोरे जावे लागले, पण त्या सर्वत्याग करून राष्ट्रीय सेवेसाठी झटत राहिल्या. मात्र सरोजिनी नायडू, मादाम कामा, प्रीतीलता वड्डेदार, कल्पना दत्त यांच्याबरोबर असंख्य स्त्रिया असून त्यांची ओळख फार कमी प्रमाणात करून दिली असल्याने संशोधन होणे गरजेचे आहे. फक्त संशोधनचे नव्हे तर आपणही या स्त्रियांसारखे राष्ट्रीय चळवळीप्रमाणे देशासाठी योगदान दिले पाहिजे. कारण आजही स्त्रिया सर्व क्षेत्रात चमकल्या, तशाच त्या राजकीय क्षेत्रातही चमकल्या. मात्र अजूनही काही भागात त्या कर्तृत्त्व हे फार कमी आहे. कारण पदभार सांभाळण्यासाठी स्त्रिया आणि कारभार पाहतात. घरचे पुरूषमंडळी अशी स्थिती हल्ली दिसून येतील. असंख्य स्त्रियांनी दिलेला लढा, तरूणींनी देशासाठी उदार केलेले प्राण, आणि त्या दोनष्शाळेकरी मुलींनी झाडलेल्या गोळ्या, हे पाहिल की त्याच्यांतील देशभक्ती किती अफाट होती हे लक्षात येते. आजही भारत माझा देश आहे. अशी प्रतिज्ञा करतो खरी पण त्या भारतासाठी प्रामाणिकपणे झटणारे लोक खूप कमी आहे. त्यामुळे आजच्या स्त्रियांनी राष्ट्रभक्ती व देशासाठी अजून कामगिरी आणि संशोधन करावे, तेव्हाच ख–या अर्थात या लढ्यातील 'स्त्रीतत्वाचा' संन्मान जपला जाईल.

**संदर्भ**


1. भारत : स्वातंत्र्य आणि विकास
2. भारताचा स्वातंत्र्य लढा 1930–34
3. स्वातंत्र्य लढ्याची गोष्ट
4. शिल्पकार स्वातंत्र्याचे
5. सामना : लेख
6. लोकसत्ता : लेख
7. मिळून सा–या जणी जुने अंक
8. विकीपिडीया




Scanned with CamScanner